# अहवाल

## “विद्यानिधी” सुवर्णमहोत्सवी वार्षिक अंक प्रकाशन, द्वितीय वर्ष छात्राध्यापक सदिच्छा समारंभ आणि मा. प्रा. डॉ. बी. जी. खाडे सर यांचा सेवापूर्ती सदिच्छा समारंभ

शासकीय अध्यापक महाविद्यालय, पनवेल येथे दिनांक 14 मे 2025 रोजी एक प्रेरणादायी आणि संस्मरणीय असा संयुक्त कार्यक्रम पार पडला. या कार्यक्रमांतर्गत "विद्यानिधी" या सुवर्णमहोत्सवी वार्षिक अंकाचे प्रकाशन, बी.एड. वर्ग 2023-2025 च्या छात्राध्यापकांचा सदिच्छा समारंभ, तसेच मा. प्रा. डॉ. बी. जी. खाडे यांचा सेवापूर्ती सोहळा अत्यंत उत्साहात साजरा करण्यात आला.

कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी महाविद्यालयाच्या प्राचार्या मा. डॉ. रमा भोसले या होत्या. या कार्यक्रमाचे आयोजन आणि मार्गदर्शन प्रा. बिजली दडपे यांनी केले. या आयोजनात बी. एड् प्रथम वर्ष छात्राध्यापकांचा उत्साही सहभाग होता. कार्यक्रमाची सुरुवात परमेश्वरी साक्ष असलेल्या सरस्वती पूजनाने करण्यात आली. मा. प्राचार्य डॉ. रमा भोसले व सर्व प्राध्यापक वृंदांच्या उपस्थितीत सरस्वती पूजनाने वातावरण भक्तिमय झाले. त्यानंतर कार्यक्रमाच्या मार्गदर्शक प्रा. बिजली दडपे यांनी माननीय प्राचार्य डॉ. रमा भोसले यांचे औपचारिक स्वागत केले. कार्यक्रमाच्या प्रारंभी “विद्यानिधी” या वार्षिक अंकाचे प्रकाशन मा. प्रा. डॉ. बी. जी. खाडे यांच्या हस्ते करण्यात आले. या अंकाचे हे सुवर्णमहोत्सवी वर्ष असून, विद्यार्थ्यांच्या शैक्षणिक, साहित्यिक आणि सांस्कृतिक योगदानाचे सुंदर प्रतिबिंब या अंकामध्ये पाहायला मिळते.

प्रास्ताविक आणि उद्देश कथन मार्गदर्शक प्रा. बिजली दडपे यांनी करत कार्यक्रमाची रूपरेषा उपस्थितांसमोर मांडली. त्यांनी द्वितीय वर्ष छात्राध्यापकांना सदिच्छा देत, प्रा. डॉ. बी. जी. खाडे सरांच्या सहप्रवासातील आठवणींना उजाळा दिला. यानंतर मा. प्रा. डॉ. बी. जी. खाडे सरांच्या सेवापूर्ती निमित्त त्यांचा प्राचार्य डॉ. रमा भोसले यांच्या हस्ते शाल, श्रीफळ व पुष्पगुच्छ देऊन सन्मानपूर्वक सत्कार करण्यात आला.

खाडे सरांसोबतच्या सहप्रवासातील आठवणी, त्यांचा शैक्षणिक वारसा आणि विद्यार्थ्यांवरील प्रभाव यावर अनेकांनी आपले मनोगत व्यक्त केले. छात्राध्यापक कार्तिकी सोनटक्के, रोशनी भांगरे, सविता वाघे, रोहिणी पठाडे व सायली जाधव यांनी आपल्या अभ्यासक्रमातील अनुभव आणि महाविद्यालयाप्रति कृतज्ञता व्यक्त करत दिलखुलास मनोगते मांडली. प्रा. डॉ. प्रियंका सुभेदार, प्रा. डॉ. नीलिमा मोरे व प्रा. डॉ. उज्वला डोने यांनीही खाडे सरांविषयी सहप्रसादरम्यांचे किस्से सांगत त्यांना भावी आरोग्यपूर्ण जीवनासाठी भावना व्यक्त करत त्यांच्या योगदानाला मानवंदना दिली.

या सदिच्छा समारंभामध्ये सत्कारमूर्ती प्राध्यापक डॉ. बी.जी. खाडे सरांनी द्वितीय वर्ष प्रशिक्षणार्थी छात्राध्यापकांना सदिच्छा देताना आपला प्रेरणादायी जीवनप्रवास उलगडला. शिक्षक म्हणून त्यांनी केलेले कार्य, अनुभव आणि मूल्य यांची सुंदर मांडणी त्यांनी आपल्या भाषणात केली. सदर कार्यक्रमांमध्ये माननीय प्राचार्य डॉ. रमा भोसले यांनी अध्यक्षीय मनोगत व्यक्त करून उपस्थितांमध्ये प्रेरणादायी ऊर्जा निर्माण केली. तसेच माननीय प्राध्यापक डॉ. बी. जी. खाडे सर यांच्यासोबतच्या त्यांच्या आठवणींना उजाळा दिला

सदर कार्यक्रमाचे आभार प्रकटीकरण श्री. आकाश राठोड यांनी अत्यंत नेटकेपणाने केले, तर संपूर्ण कार्यक्रमाचे प्रभावी आणि संयत निवेदन श्री. रोहन भोईर यांनी समर्थपणे सांभाळले.

## कार्यक्रमाची क्षणचित्रे




**सरस्वती पूजन करताना मा. प्राचार्य डॉ. रमा भोसले**




**मा. प्राचार्य डॉ. रमा भोसले यांचे स्वागत करताना मार्गदर्शक प्राध्यापक बिजली दडपे**




**विद्यानिधी सुवर्ण महोत्सवी वार्षिक अंकाचे प्रकाशन करताना मा. प्राचार्य डॉ. रमा भोसले व उपस्थित सर्व प्राध्यापक वृंद**




**प्रास्ताविक तसेच प्रा. डॉ. बी. जी. खाडे सर यांच्या विषयी मनोगत कथन करताना प्रा. बिजली दडपे**



सेवानिवृत्ती निमित्त प्रा. डॉ. बी. जी. खाडे सर यांचा

सत्कार करताना मा. प्राचार्य




मनोगत व्यक्त करताना सत्कारमूर्ती


मा. प्रा. डॉ. बी. जी. खाडे सर










## कार्यक्रमामध्ये आपले मनोगत व्यक्त करताना प्रशिक्षणार्थी छात्राध्यापक













## कार्यक्रमामध्ये आपले मनोगत व्यक्त करताना मा. प्राचार्य तसेच सर्व प्राध्यापक वृंद







**कार्यक्रमाचे आभार प्रकटीकरण करताना**

**श्री. आकाश राठोड**

**कार्यक्रमाचे निवेदन करताना**

**श्री. रोहन भोईर**